**Maha Mumbai Metro Extends Service Hours for Maharashtra Assembly Elections 2024**

**Extended Metro Services to Assist Election Staff and Empower Voters on Polling Day**

Mumbai, November 18, 2024:

In a significant move to support public participation in the Maharashtra Legislative Assembly General Election 2024, Maha Mumbai Metro Operations Corporation Ltd (MMMOCL) has announced extended metro services on November 20, 2024. These extended services aim to facilitate voters and election duty staff, ensuring seamless connectivity during this crucial period.

To accommodate the anticipated increase in travel needs, metro services will begin earlier than usual and run later into the night. The first train will depart at 04:00 Hrs. from Gundavali, Dahisar East, and Andheri West stations, while the last train will leave at 01:00 Hrs. (past midnight) on November 21, 2024.

*Key Service Details:

- Special Extended Hours:
  - Early morning services: 04:00 Hrs. – 05:22 Hrs.
  - Late-night services: 23:00 Hrs. – 01:00 Hrs.
  - Headway: 20 minutes during these extended hours.
- Enhanced Operations:
  - A total of 19 additional trips have been planned, increasing the total daily trips from 243 (Same as Saturday schedule) to 262 trips.
  - Regular services from 05:22 Hrs. to 23:00 Hrs.

This initiative is designed not only to ease the travel of election officials to their respective voting centers and back home but also to encourage higher voter turnout by providing convenient transportation for the general public.

Dr. Sanjay Mukherjee, IAS, Metropolitan Commissioner, MMRDA, emphasized the importance of this initiative:

"As citizens of the world’s largest democracy, it is our duty to facilitate a smooth electoral process. By extending metro services, we aim to provide a reliable and comfortable travel option for election staff and voters, ensuring maximum participation in this democratic exercise."

Echoing the sentiment, Ms. Rubal Agarwal, Managing Director, Maha Mumbai Metro Operations Corporation Ltd, said:

Elections are a cornerstone of our democracy, and MMMOCL is committed to serving the public interest. These extended services reflect our dedication to ensuring every citizen has the opportunity to vote conveniently while maintaining the highest standards of metro operations.

MMRDA and MMMOCL urge all eligible voters to exercise their right to vote and take advantage of the extended metro services on Election Day. Together, let’s strengthen our democracy.*

**महामुंबई मेट्रोने महाराष्ट्र विधानसभा निवडणूक ,२०२४ साठी फेऱ्यांची वेळ वाढवली**

**मतदानाच्या दिवशी निवडणूक कर्मचाऱ्यांना मदत मिळावी आणि मतदारांना सोयीस्कर प्रवासाची सुविधा मिळावी यासाठी मेट्रो सेवा वाढवण्यात आल्या आहेत.**

मुंबई, १८ नोव्हेंबर २०२४: महाराष्ट्र विधानसभेच्या २०२४ च्या सार्वत्रिक निवडणुकांमध्ये जास्तीत जास्त जनतेने सहभागी व्हावे यासाठी महत्त्वाचे पाऊल उचलत महामुंबई मेट्रो ऑपरेशन्स कॉर्पोरेशन लिमिटेडतर्फे (एमएमएमओसीएल) २० नोव्हेंबर, २०२४ रोजी मेट्रो सेवेची वेळ वाढविण्यात आल्याची घोषणा करण्यात आली आहे. या महत्त्वाच्या काळात मतदार आणि निवडणूक कर्मचाऱ्यांना सहज आणि सोयीस्कर प्रवासाची सुविधा उपलब्ध करून देणे, हा या विस्तारित सेवांचा उद्देश आहे.

मतदानाच्या दिवशी प्रवासाच्या वाढत्या गरजा लक्षात घेऊन मेट्रो सेवा नेहमीपेक्षा लवकर सुरू होतील आणि रात्री उशिरापर्यंत सुरू राहतील. २० नोव्हेंबर, २०२४ रोजी पहिली मेट्रो पहाटे ४ वाजता गुंदवली, दहिसर (पूर्व) आणि अंधेरी (पश्चिम) स्थानकांवरून सुटेल. तर शेवटची मेट्रो २० नोव्हेंबर, २०२४ च्या मध्यरात्री म्हणजे २१ नोव्हेंबर, २०२४ रोजी १ वाजता सुटेल.

**महत्त्वाचे मेट्रो सेवा तपशील:**

- विशेष वाढीव वेळा:
  - सकाळच्या सेवा : ०४:०० वाजता – ०५:२२ वाजता
  - रात्री उशिराच्या सेवा : रात्री ११ वाजता – मध्यरात्री १ वाजता
  - या वाढीव वेळेत मेट्रो दर २० मिनिटांनी उपलब्ध असेल
- विस्तारित कामकाज:
  - एकूण १९ अतिरिक्त फेऱ्या नियोजित करण्यात आल्या आहेत. यामुळे एकूण दैनिक फेऱ्या २४३ वरून २६२ फेऱ्यांपर्यंत वाढतील.
  - नियमित सेवा ०५:२२ वाजता ते २३:०० वाजता दरम्यान सुरू राहतील.

ही योजना केवळ निवडणूक अधिकाऱ्यांचा त्यांच्या मतदान केंद्रांपर्यंतचा आणि परतीचा प्रवास सुलभ करण्यासाठी तर आहेच, त्याचप्रमाणे सर्वसामान्य जनतेसाठी सोयीस्कर वाहतुकीची सुविधा उपलब्ध करून देत मतदारांचा अधिक मोठ्या प्रमाणावर सहभाग वाढवण्यासाठीही या सेवेचे नियोजन करण्यात आले आहे.

एमएमआरडीएचे महानगर आयुक्त डॉ. संजय मुखर्जी, भाप्रसे यांनी या उपक्रमाचे महत्त्व स्पष्ट केले:

"जगातील सर्वात मोठ्या लोकशाहीचे नागरिक म्हणून, सुरळीत आणि निर्विघ्न निवडणूक प्रक्रिया सुनिश्चित करणे आपले कर्तव्य आहे. मेट्रो सेवेच्या वेळा वाढवून, आम्ही निवडणूक कर्मचाऱ्यांना आणि मतदारांना विश्वासार्ह आणि आरामदायक प्रवासाचा पर्याय देण्याचे आमचे उद्दिष्ट आहे, जेणेकरून या लोकशाही प्रक्रियेत जास्तीत जास्त सहभाग साध्य होईल."

महामुंबई मेट्रो ऑपरेशन्स कॉर्पोरेशन लिमिटेडच्या व्यवस्थापकीय संचालिका, श्रीमती रुबल अग्रवाल म्हणाल्या;

"निवडणुका या आपल्या लोकशाहीची मुख्य आधारशिला आहेत, आणि एमएमएमओसीएल सार्वजनिक हितासाठी कटिबद्ध आहे. या वाढीव सेवांद्वारे आम्ही प्रत्येक नागरिकाला सोयीस्करपणे मतदान करण्याची संधी उपलब्ध करून देण्याबरोबरच मेट्रो संचालनाची सर्वोच्च गुणवत्ता कायम राखण्याचे आमचे बांधिलकी दर्‌शवत आहोत."

सर्व पात्र मतदारांना त्यांच्या मतदानाचा हक्क बजावण्याचे आणि निवडणूक दिवशी उपलब्ध असलेल्या वाढीव मेट्रो सेवांचा लाभ घेण्याचे एमएमआरडीए आणि एमएमएमओसीएलतर्फे आवाहन करण्यात येत आहे.

चला, एकत्र येऊन आपली लोकशाही अधिक बळकट करूया.